तरुण भारत ? ऑगस्ट 2003

# कमला कॉलेजमध्ये उद्या युवती सहकार मेळावा

**कोल्हापूर ■**

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक कै. व्ही. टी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त कमला कॉलेज व जिल्हा सहकार बोर्ड यांच्यावतीने २ ऑगस्ट रोजी युवती सहकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता कमला कॉलेजमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमाला रोजगार व स्वयंरोजगार केंद्राचे सहाय्यक संचालक अनिल पोवार, जिल्हा व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी एच. आय. शिंदे आदी मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याला युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.